दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०६७ • पुणे • शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

काँग्रेसने मैदान मारलं

राजस्थान पंचायत निवडणूक निकाल २०२६ : काँग्रेसची जोरदार मुसंडी, एवढ्या जागांवर घेतली आघाडी, भाजपाला दणका



३७ पैकी २७ जिल्हा परिषदेत काँग्रेसची सत्ता

जयपूर (दै. आरंभ पर्व)

राजस्थानमधील स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीत भाजपचा मोठा पराभव झाला आहे. काँग्रेसच्या लाटेत भाजपचा दोन तृतियांशपेक्षा अधिक जागांवर पराभव झाला आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपचा पराभव झाला आहे. 37 जिल्हा परिषदेच्या मतमोजणीत काँग्रेसनं 27 जिल्हा परिषदेत विजय मिळवला आहे. भाजपला 6 जिल्हा परिषदेत बहुमत मिळालं आहे.

भाजपचा सर्वात मोठा पराभव राजधानी असलेल्या जयपूर जिल्हा परिषदेत झाला आहे. जयपूरच्या 57 जागांपैकी भाजपला केवळ 12 जागांवर विजय मिळवता आला आहे. काँग्रेसनं 41 जागांवर विजय मिळवला आहे. राजधानी जयपूरमधील 22 पंचायत समित्यांपैकी 2 पंचायत समित्यांमध्ये भाजपला दोन ठिकाणी बहुमत मिळालं आहे. तर, काँग्रेसला 14 पंचायत समित्यात विजय मिळवला आहे. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या सांगानेर मतदारसंघात खासदार हनुमान बेनीवाल यांच्या राष्ट्रीय लोकतांत्रिक पार्टीनं बहुमत मिळवलं आहे.

नागौर जिल्ह्यात असदुद्दीन ओवैसी यांच्या पाठिंब्यावर निवडूक लढवणाऱ्या खासदार हनुमान बेनीवाल यांच्या राष्ट्रीय लोकतांत्रिक पार्टीला बहुमत मिळालं आहे. 3 जिल्ह्यांमध्ये कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालं नव्हतं. 419 पंचायत समित्यांच्या निकाल आणि कलांमध्ये काँग्रेस पक्षाला मोठा विजय मिळाला आहे.

कांग्रेसला 269 पंचायत समित्यांमध्ये बहुमत मिळालं आहे. भाजपला 73 पंचायत समित्यांमध्ये विजय मिळाला आहे. 60 समित्यांमध्ये अपक्ष आणि इतर पक्षांनी विजय मिळवला आहे. तर, 17 पंचायत समित्यांचं चित्र स्पष्ट झालेलं नाही.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत हनुमान बेनीवाल यांच्या राष्ट्रीय लोकतांत्रिक पार्टी आणि राजकुमार रोत यांच्या भारत आदिवासी पार्टी या सारख्या छोट्या राजकीय पक्षांनी दमदार कामगिरी केली आहे.मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि केंद्र आणि राज्यातील मंत्र्यांचा मतदारसंघात भाजपचा पराभव झाला आहे. राजस्थानच्या ग्रामीण भागातील 48 लाख मतदारांनी भाजपला धक्का दिला आहे. जयपूर, जोधपूर, बीकानेर आणि भीलवाडा या सारख्या मोठ्या जिल्ह्यांमध्ये काँग्रेसनं कमबॅक केलं आहे. राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या सांगानेर पंचायत समितीत हनुमान बेनीवाल यांच्या आरएलपीनं विजय मिळवला. भरतपूर जिल्हा परिषदेत काँग्रेसनं विजय मिळवला आहे.

रेस्टॉरंटच्या बिलात मनमानी सर्व्हिस चार्ज आकारता येणार नाही!



- ग्राहकांना मोठा दिलासा
- दिल्ली उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये जेवणासाठी जाणाऱ्या ग्राहकांना सर्व्हिस चार्जच्या मुद्द्यावर मोठा दिलासा मिळाला आहे. ग्राहकांकडून सक्तीने सर्व्हिस चार्ज वसूल करण्यास रेस्टॉरंटना परवानगी देणारा कोणताही अंतरिम दिलासा न्यायालयाने दिलेला नाही, असे महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी दिले.

रेस्टॉरंटच्या बिलामध्ये सर्व्हिस चार्जचा समावेश करण्यात आला असला, तरी ग्राहकांना तो अनिवार्यपणे भरावा लागतो, असा त्याचा अर्थ होत नाही. त्यामुळे ग्राहकांच्या संमतीशिवाय किंवा इच्छेविरुद्ध सर्व्हिस चार्ज आकारला जात असल्यास त्यावर आक्षेप घेण्याचा अधिकार ग्राहकांना आहे.

दरम्यान, सर्व्हिस चार्ज आणि वस्तू व सेवा कर (जीएसटी) या दोन स्वतंत्र बाबी आहेत. त्यामुळे या दोन्ही शुल्कांमध्ये गोंधळ न करता ग्राहकांनी बिलाची तपासणी करणे आवश्यक आहे.हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये जेवणाच्या मूळ किमतीव्यतिरिक्त विविध प्रकारची अतिरिक्त शुल्क आकारली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अनेकदा ग्राहकांना बिलामध्ये समाविष्ट केलेला सर्व्हिस चार्ज भरण्यास भाग पाडले जाते. अशा परिस्थितीत दिल्ली उच्च न्यायालयाने केलेले हे स्पष्टीकरण ग्राहकांच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे. बिलामध्ये सर्व्हिस चार्ज दिसल्यास त्याबाबत रेस्टॉरंट व्यवस्थापनाकडे स्पष्टीकरण मागता येते आणि सक्तीने आकारणी होत असल्यास त्यावर आक्षेप नोंदवता येतो.

रॉकेट आणि आकाशात उडणाऱ्या फटाक्यांवर बंदी



- पुणे महापालिका आयुक्तांचा आदेश

पुणे (दै. आरंभ पर्व)

दिवाळी आणि त्यानंतरच्या काळात फटाक्यांमुळे आग लागण्याच्या घटना तसेच नागरिकांच्या जीविताला आणि मालमत्तेला निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन पुणे शहरात रॉकेट आणि तत्सम आकाशात उडणाऱ्या फटाक्यांच्या वापरावर पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. पुणे पालिका आयुक्त तथा शहरी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष नवल किशोर राम यांनी याबाबत आदेश दिले आहेत. शहर महापालिका हद्दीत फटाक्यांमुळे आग लागण्याच्या अनेक घटना निदर्शनास आल्या आहेत. विशेषतः रॉकेट तत्सम आकाशात उडणारे फटाके उडविताना ते इमारतींच्या छतांवर, बाल्कनीमध्ये, खिडक्यांमध्ये तसेच मोकळ्या जागेत पडण्याची शक्यता असते. यामुळे गवत, झाडे आणि ज्वलनशील साहित्याला आग लागण्याचा धोका निर्माण होतो. अशा घटनांमुळे नागरिकांच्या जीवितासह मालमत्तेलाही गंभीर धोका संभवतो. काही नागरिकांकडून रॉकेट आणि तत्सम फटाके हातात धरून धोकादायक पद्धतीने उडविले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या कृतींमुळे आगीच्या दुर्घटना घडण्याची आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

रिक्षाचालकांचे २३ पासून आंदोलन

पुणे (दै. आरंभ पर्व)

ई-बाईक टॅक्सीच्या माध्यमातून सुरू होणाऱ्या प्रवासी वाहतुकीला विरोध करण्यासाठी पुण्यासह राज्यातील रिक्षाचालक संघटना आक्रमक झाल्या आहेत. पुणे जिल्हा रिक्षा चालक-मालक कृती समिती आणि राज्यातील सर्व रिक्षा संघटनांच्या वतीने सोमवार, (दि.२३) रोजी सकाळी ११ वाजता पुणे आरटीओ कार्यालयासमोर एकदिवसीय संप पुकारण्यात आला आहे. त्यानंतर मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात पुणे जिल्ह्यातील सुमारे दीड लाख, तर राज्यातील १५ ते २० लाख रिक्षाचालक सहभागी होणार असल्याचा दावा संघटनांनी केला आहे. ई-बाईक टॅक्सीमुळे पारंपरिक रिक्षा व्यवसायावर परिणाम होऊन लाखो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होईल, अशी भूमिका संघटनांनी मांडली. पत्रकार परिषदेत आंदोलनाची घोषणा करताना परिवहन विभागावर अनधिकृत प्रवासी वाहतुकीला प्रोत्साहन दिल्याचा आरोप करण्यात आला.

लोणावळ्यातील ४ नामांकित हॉटेलचे परवाने निलंबित

मुदतबाह्य खाद्यपदार्थ, झुरळांचा वावर, अस्वच्छता



पुणे (दै. आरंभ पर्व)

लोणावळा परिसरातील नामांकित हॉटेल्समध्ये अन्न सुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन होत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) अचानक तपासणीत उघड झाले आहे. मुदतबाह्य खाद्यपदार्थांचा वापर, स्वयंपाकघरातील अस्वच्छता, झुरळांचा वावर, अन्नपदार्थांच्या साठवणुकीतील त्रुटी अशा गंभीर बाबी आढळल्याने चार मोठ्या हॉटेल्सचे अन्न परवाने तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहेत. 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत बुधवारी (दि. १८) ही तपासणी करण्यात आली. या कारवाईत दि ऑर्किड, रिदम, द फर्न आणि बेसिलिका या हॉटेल्सचा समावेश आहे. अन्न सुरक्षा व मानके कायदा तसेच स्वच्छतेसंदर्भातील नियमांचे उल्लंघन झाल्याचे तपासणीत निदर्शनास आले.

वलवण येथील दि ऑर्किड हॉटेलच्या स्वयंपाकघरात तीन, तर कोल्ड स्टोरेजमध्ये आठ अशी एकूण ११ मुदतबाह्य दुधाची पाकिटे आढळली. अन्नपदार्थांच्या साठवणुकीसाठी आवश्यक असलेल्या फर्स्ट इन फर्स्ट आउट आणि फर्स्ट एक्सपायर्ड फर्स्ट आउट पद्धतींचे पालन केले जात नव्हते. कच्चे आणि शिजवलेले पदार्थ एकत्र ठेवले होते. फ्रीज, चॉपिंग बोर्ड आणि शेगडीमागील भाग अस्वच्छ होता. स्वयंपाकघरात पाणी साचलेले असण्यासह कचरापेट्या उघड्या होत्या. कर्मचाऱ्यांकडून संरक्षक कपड्यांचाही वापर केला जात नव्हता.

तुंगार्ली येथील रिदम हॉटेलच्या मुख्य स्वयंपाकघर आणि बेकरी विभागातील फ्रीजजवळ झुरळांचा वावर आढळला. पेस्ट कंट्रोलचे रेकॉर्डही सादर करण्यात आले नाहीत. शाकाहारी-मांसाहारी तसेच कच्चे आणि शिजवलेले पदार्थ स्वतंत्रपणे ठेवले जात नव्हते. फ्रीजमधील पदार्थ आणि सॉसच्या बाटल्यांवर लेबल नव्हते. बेकरी यंत्रसामग्री व फ्रीजची नियमित स्वच्छता केली जात नसल्याचेही आढळले. अन्न पॅकेजिंग साहित्याचे फूड ग्रेड प्रमाणपत्र आणि कर्मचाऱ्यांच्या FoSTaC प्रशिक्षणाची प्रमाणपत्रे उपलब्ध नव्हती.

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील बेसिलिका हॉटेलमध्ये कोल्ड स्टोरेजमध्ये मुदतबाह्य चीज आणि ब्रेड आढळले. हे पदार्थ जागेवरच नष्ट करण्यात आले. कच्च्या चिकनमधून रक्तमिश्रित पाणी गळत असल्याचे, तसेच मांसाहारी पदार्थ चुकीच्या पद्धतीने वितळवले जात असल्याचे निदर्शनास आले. शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांसाठी स्वतंत्र फ्रीज, भांडी व कप्प्यांची व्यवस्था नव्हती. अन्न रंग आणि अजिनोमोटोचा वापर होत असतानाही मेनू कार्डवर त्याचा उल्लेख नव्हता. कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रमाणपत्रे, पेस्ट कंट्रोल अहवाल आणि वापरलेल्या तेलाच्या नोंदीही उपलब्ध नव्हत्या.

जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला पोलिसांकडून अटक

४० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून आरोपीचा शोध; २० हजारांचा मोबाईल हस्तगत



पुणे (दै. आरंभ पर्व)

रात्रीच्या वेळी दुचाकीवरून येऊन नागरिकांना अडवून शिवीगाळ व मारहाण करत जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला येरवडा पोलिसांनी अटक केली आहे. रेहान अश्रफ शेख (वय १९, रा. स. नं. २६, कलवड वस्ती, लोहगाव, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेला सॅमसंग कंपनीचा २० हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन हस्तगत केला आहे.

येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पुणे-नगर रोडवरून विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्रीच्या वेळी जबरी चोरीची घटना घडली होती. दुचाकीवरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना कोणतेही कारण नसताना शिवीगाळ करून मारहाण केली. त्यानंतर त्यांच्या ताब्यातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन, दोन ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी आणि रोख २९ हजार ६०० रुपये असा एकूण ५८ हजार ६०० रुपयांचा ऐवज जबरदस्तीने चोरून नेला होता. या प्रकरणी दि. ९ नोव्हेंबर २०२६ रोजी येरवडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ३९५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०९ (६), ३०९ (४), १२६ (२), ३५२ आणि ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर घटना गंभीर स्वरूपाची असल्याने आरोपींना तातडीने ताब्यात घेण्याच्या सूचना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तपास पथकाला दिल्या होत्या. पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ श्री. चिलुमूला रजनिकांत आणि सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग श्री. सुनील जैतापूरकर यांनीही तपासाबाबत आवश्यक सूचना दिल्या होत्या. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशनच्या तपास पथकातील पोलीस अंमलदार गणेश पालवे, नटराज सुतार आणि संदिप जायभाये यांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर घटनास्थळासह परिसरातील एकूण ४० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले.

सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करून तसेच गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीची खात्री केल्यानंतर गुन्ह्यातील आरोपी कलवड वस्ती, लोहगाव परिसरात राहत असल्याचे पोलिसांना समजले. त्यानंतर तपास पथकाने तातडीने आरोपीच्या राहत्या घरी जाऊन त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव रेहान अश्रफ शेख (वय १९) असल्याचे सांगितले. दाखल गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर त्याला पुढील कारवाईसाठी येरवडा पोलीस स्टेशन येथे आणून दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली. आरोपीकडून फिर्यादी यांचा चोरीस गेलेला सॅमसंग कंपनीचा २० हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड करीत आहेत. ही कामगिरी पुणे शहर पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त श्री. संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) श्री. मनोज पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ श्री. चिलुमूला रजनिकांत आणि सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग श्री. सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

तसेच येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. उमेश गित्ते, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. केशव दिंडे आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती शारदा कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड, पोलीस हवालदार मुकुंद कोकणे, पोलीस अंमलदार गणेश पालवे, नटराज सुतार, शैलेश वाबळे, साईनाथ म्हस्के, अनिल मन्हाळकर, प्रशांत कांबळे, संदिप जायभाये, सोमनाथ गायकवाड आणि संदिप धादवड यांनी ही कामगिरी केली.

मासिक पाळीमुळे संधी हुकणार नाही!

तरुणींना शारीरिक चाचणीसाठी मुदतवाढ, राज्य सरकारचा महत्त्वाचा निर्णय



मासिक पाळीदरम्यान शारीरिक चाचणीवर होणारे परिणाम

- पोटदुखी आणि कळा – मासिक पाळीदरम्यान गर्भाशयाच्या आकुंचनामुळे पोटात तीव्र कळा येऊ शकतात. त्यामुळे धावताना वेदना जाणवतात.
- थकवा आणि अशक्तपणा – काही तरुणींना थकवा, कमी ऊर्जा आणि अशक्तपणा जाणवतो. त्यामुळे धावण्याचा वेग आणि सातत्य राखणे कठीण होऊ शकते.
- कंबरदुखी आणि स्नायूंच्या वेदना – कंबरदुखी, मांडीतील वेदना आणि अंगदुखीमुळे शारीरिक हालचालींवर मर्यादा येऊ शकतात.
- चक्कर आणि मळमळ – काही महिलांना चक्कर, डोकेदुखी, मळमळ किंवा उलट्यांचा त्रास होतो. त्यामुळे शारीरिक चाचणीदरम्यान एकाग्रता कमी होऊ शकते.
- धावण्याच्या क्षमतेवर परिणाम – वेदना आणि थकव्यामुळे 100 मीटर आणि 800 मीटर धावण्याच्या चाचणीत अपेक्षित वेग राखण्यात अडचणी येऊ शकतात.
- गोळाफेक आणि लांब उडी – शरीराला जोर लावताना, धावत येताना किंवा उडी मारताना वेदना आणि अस्वस्थतेचा सामना करावा लागू शकतो.

पुणे (दै. आरंभ पर्व)

पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणींसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ऐन शारीरिक चाचणीच्या दिवशी मासिक पाळी आली म्हणून आता तरुणींची संधी हुकणार नाही. अशा तरुणींना आरोग्य तपासणीनंतर पाच ते सहा दिवसांची मुदतवाढ दिली जाणार आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी ही घोषणा केली आहे.

महिनोन्‌महिने मैदानावर घाम गाळायचा, धावण्याचा सराव करायचा, पोलीस होण्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी जीवाचं रान करायचं पण ऐन शारीरिक चाचणीच्या दिवशी मासिक पाळी आली आणि पोटात कळा सुरू झाल्या, कंबरदुखी किंवा अशक्तपणामुळे धावता आलं नाही, तर मेहनतीवर पाणी फिरण्याची भीती अनेक मुलींना असते. मात्र, आता अशा तरुणींसाठी सरकारने महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे.

मासिक पाळीच्या काळात काही तरुणींना तीव्र पोटदुखी, कंबरदुखी, थकवा, अशक्तपणा आणि चक्कर येण्याचा त्रास होतो. अशा परिस्थितीत 100 मीटर आणि 800 मीटर धावणं, गोळाफेक किंवा लांब उडीसारख्या शारीरिक चाचण्या देताना अडचणी येऊ शकतात. प्रत्येक मुलीला होणारा त्रास वेगवेगळा असतो. पण ऐन परीक्षेच्या दिवशी हा त्रास झाला तर कामगिरीवर त्याचा परिणाम होऊ शकतो. मासिक पाळीदरम्यान शरीरात बदल होतात. या काळात धावण्याच्या क्षमतेवर किती परिणाम होतो. अशा वेळी मुलींनी काळजी घ्यावी लागते, असे स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अपूर्वा देशपांडे यांनी सांगितले. या सगळ्या गोष्टी ध्यानात घेऊन राज्य सरकारने मासिक पाळीच्या काळात शारीरिक चाचणी आल्यास मुलींना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

सरकारच्या या निर्णयाचं पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणींनीही स्वागत केलं आहे. अनेक महिने तयारी करून शारीरिक चाचणीची वेळ येते. मात्र, मासिक पाळीमुळे वेदना आणि अशक्तपणाचा सामना करावा लागला तर अपेक्षित कामगिरी करणं कठीण होते. त्यामुळे केवळ मासिक पाळीमुळे एखाद्या मुलीची संधी हुकू नये, अशी भावना या तरुणींनी व्यक्त केली आहे. मासिक पाळी ही नैसर्गिक प्रक्रिया आहे.

संपादकीय - सुरेखा-मते

विकासाच्या मोठ्या गप्पा

पुणे म्हणजे महाराष्ट्राचे प्रगत शहर, औद्योगिक विकासाचे केंद्र, शिक्षणाचे माहेरघर आणि राज्याच्या आर्थिक प्रगतीचे प्रतीक! मात्र याच पुणे जिल्ह्यात आज पाण्यासाठी चिंतेचे ढग दाटले आहेत. तब्बल ५४ वर्षांनंतर प्रथमच जिल्ह्यातील सर्व ९३ तालुके दुष्काळाच्या संकटाला सामोरे जात असल्याचे वृत्त समोर आले आहे. ही परिस्थिती केवळ निसर्गाची अवकृपा म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. उलट, आपल्या जलव्यवस्थापनाच्या धोरणांचा आणि नियोजनाचा गांभीर्याने आढावा घेण्याची ही वेळ आहे.



एकीकडे पुणे शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे. उंच इमारती, मोठमोठे गृहप्रकल्प, औद्योगिक वसाहती, रस्ते, उड्डाणपूल आणि सुशोभीकरणाच्या कामांवर कोट्यवधी रुपयांची उधळण सुरू आहे. विकासाच्या या झगमगाटात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेतात मात्र पाण्याचा थेंब पोहोचत नसेल, तर या विकासाच्या संकल्पनेचा नेमका फायदा कोणाला होत आहे, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

आज शेतकऱ्यांसमोर सर्वात मोठे संकट रब्बी हंगामाचे आहे. जमिनीत पुरेसा ओलावा नाही, विहिरींची पाणीपातळी खालावली आहे आणि सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता अनिश्चित आहे. खरीप हंगामातील नुकसानीनंतर रब्बी हंगामाची आशा धरलेल्या शेतकऱ्यांच्या स्वप्नांवरही पाणी फिरण्याची भीती निर्माण झाली आहे. शेतकऱ्याने पेरणी करायची की नाही, जनावरांसाठी चारा कुठून आणायचा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, या प्रश्नांनी त्याला घेरले आहे.

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित राहणार नाही. ग्रामीण भागातील उत्पादन घटले, तर त्याचा परिणाम बाजारपेठेवर होईल. भाजीपाला, धान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आज शेतात निर्माण झालेले पाण्याचे संकट उद्या शहरातील सामान्य ग्राहकाच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचणार आहे.

सरकारने दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये अनावश्यक नवीन बांधकामे तात्पुरती थांबवून उपलब्ध निधी पाणीपुरवठा आणि दुष्काळ निवारणासाठी वळविण्याचे निर्देश दिले आहेत. हा निर्णय स्वागतार्ह असला, तरी तो पुरेसा नाही. दुष्काळ जाहीर करणे, पंचनामे करणे आणि मदतीच्या घोषणा करणे एवढ्यावर प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी, चारा आणि आर्थिक मदत पोहोचली पाहिजे.

पुणे जिल्ह्याला धरणांचा आणि जलसंपत्तीचा मोठा वारसा लाभला आहे. असे असतानाही ग्रामीण भागात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होत असेल, तर पाण्याचे वितरण, साठवणूक आणि नियोजन यांचा फेरविचार करणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी अडविणे, शेततळी उभारणे, बंधारे बांधणे, नद्यांचे पुनरुज्जीवन करणे, भूजल पातळी वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे या उपाययोजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरल्या पाहिजेत.

यापुढे प्रत्येक निवडणुकीत पाणीपुरवठा आणि सिंचन हा राजकीय आश्वासनांचा विषय न राहता लोकप्रतिनिधींच्या कामगिरीचा महत्त्वाचा निकष बनला पाहिजे. कोणत्या गावाला किती पाणी मिळाले, किती शेतजमीन सिंचनाखाली आली, किती जलसंधारणाची कामे पूर्ण झाली आणि किती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला, याचा हिशेब जनतेसमोर मांडला गेला पाहिजे.

दुष्काळ हा केवळ पावसाच्या कमतरतेचा परिणाम नसतो; तो अनेकदा अपुऱ्या नियोजनाचाही आरसा असतो. आज पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची वेळ आली आहे. विकासाच्या नावाखाली सिमेंटची जंगले उभी करताना पाण्याचे स्रोत नष्ट होणार नाहीत, याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

सरकार, प्रशासन, लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक या सर्वांनी एकत्रितपणे जलसुरक्षेचा प्रश्न हाताळला पाहिजे. अन्यथा आजचा दुष्काळ उद्याचे कायमस्वरूपी संकट बनू शकतो. कारण रस्ते, इमारती आणि उड्डाणपूल विकासाची प्रतीके असतील; पण पाणी हे जीवनाचे प्रतीक आहे. पाण्याविना विकासाचा कोणताही डोलारा टिकू शकत नाही. शेतकऱ्याच्या शेतात पाणी आणि सामान्य माणसाच्या घरात पिण्याचे पाणी पोहोचवणे, हाच खऱ्या विकासाचा पहिला निकष असला पाहिजे!

शासकीय तंत्रनिकेतनच्या नामांतरावरून वादाची ठिणगी!

- शासनाने जाहीर केलेल्या 'दत्तोपंत मसकर' नामकरणाला ग्रामस्थांचा विरोध
- स्थानिक इतिहासपुरुषांचे नाव देण्याची मागणी, अन्यथा दादा फाऊंडेशनचा आंदोलनाचा इशारा



पुरंदर (दै. आरंभ पर्व)

जेजुरी येथील शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयाच्या नामांतरावरून आता नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या संस्थेला 'दत्तोपंत मसकर शासकीय तंत्रनिकेतन' असे नाव देण्याचे शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आल्याचे वृत्त मंगळवारी (दि. १०) एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध होताच जेजुरीसह पुरंदर तालुक्यातील नागरिकांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. शासनाने जाहीर केलेल्या नामकरणाला स्थानिक ग्रामस्थांनी विरोध दर्शविला असून, पुरंदरच्या ऐतिहासिक वारशातील एखाद्या महापुरुषाचे नाव या संस्थेला देण्यात यावे, अशी मागणी पुढे आली आहे.

पुरंदर तालुका हा छत्रपती शिवरायांच्या स्वराज्याच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण भूमी आहे. स्वराज्याच्या लढाया, शौर्य, बलिदान, संतपरंपरा आणि सामाजिक सुधारणांचा समृद्ध वारसा या भूमीला लाभला आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या श्री खंडोबाचे अधिष्ठान असलेल्या जेजुरी नगरीलाही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. असे असताना शासनाला पुरंदरच्या इतिहासातील महापुरुषांची नावे आठवली नाहीत काय, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

जेजुरी येथील शासकीय तंत्रनिकेतन संस्था गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असून, या संस्थेत परिसरातील सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब आणि श्रमिक कुटुंबांतील विद्यार्थी तांत्रिक शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या संस्थेचे नामकरण करताना स्थानिक जनभावना, ऐतिहासिक वारसा आणि लोकप्रतिनिधींचे मत विचारात घेणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

शासनाने जाहीर केलेल्या दत्तोपंत मसकर या नावाला ग्रामस्थांचा विरोध असून, पुरंदरमधील लोकप्रतिनिधींशी चर्चा करून नामकरणाचा निर्णय पुन्हा विचारात घ्यावा, अशी मागणी दादा फाऊंडेशनच्या वतीने करण्यात येणार आहे. यासंदर्भात आमदार विजय शिवतारे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्रशिक्षणमंत्री यांना निवेदन देण्यात येणार आहे. शासनाने लोकभावनेचा विचार करून नामकरणात बदल केला नाही, तर दादा फाऊंडेशनच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजीराजे यांची जन्मभूमी असलेला पुरंदर, स्वराज्याच्या पहिल्या महाराणी सईबाईसाहेब यांचे पुरंदर किल्ल्यावरील वास्तव्य, ब्रिटिश राजवटीविरोधात बंड पुकारणारे आद्य क्रांतिवीर उमाजीराजे नाईक आणि हरी मकाजी नाईक यांचे योगदानही या भूमीच्या इतिहासात महत्त्वाचे आहे.

जेजुरीच्या विकासात योगदान देणारे मल्हारराव होळकर घराणे, पेशवेकालीन शाहीर सगनभाऊ जेजुरीकर, सत्यशोधक चळवळीचे जनक महात्मा ज्योतिराव फुले, तसेच जेजुरी येथे झालेली शहाजीराजे आणि छत्रपती शिवाजीराजे यांची ऐतिहासिक भेट अशा अनेक घटनांनी पुरंदरचा इतिहास समृद्ध झाला आहे.तर अलीकडच्या काळातील नामांकित कै लावणीसम्राज्ञानि रोशन सातारकर, या ऐतिहासिकआणि सांस्कृतिक वारशाचा विचार करून शासनाने जेजुरीच्या शासकीय तंत्रनिकेतन संस्थेला यापैकी एखाद्या इतिहासपुरुषाचे नाव द्यावे, अशी मागणी दादा फाऊंडेशनच्या वतीने पुढे आणण्यात येणार आहे.

पुरंदरच्या इतिहासात अनेक महापुरुषांचे योगदान!

पुरंदरच्या भूमीला शौर्य, पराक्रम आणि बलिदानाचा मोठा इतिहास लाभला आहे इंग्रजांविरुद्ध पहिले बंड पुकारणारे आद्य क्रांतिकारनरवीर उमाजी नाईक . स्वराज्याच्या पहिल्या लढाईत बलिदान देणारे सरदार गोदाजीराजे जगताप, शिवाजीराव इंगळे, स्वराज्याचे पहिले सेनापती वीर बाजी पासलकर, पुरंदरच्या लढाईत पराक्रमाची शर्थ करून बलिदान देणारे मुरारबाजी देशपांडे, तसेच मुघल सरदार मिर्झाराजे जयसिंह आणि दिलेरखान यांच्या ऐतिहासिक मोहिमांचा पुरंदरच्या इतिहासाशी संबंध आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



नवीन ह्युंदाई वेरनाला भारत एनकॅपकडून ५ स्टार सुरक्षा मानांकन


गुरुग्राम (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेडने (एचएमआयएल) आज जाहीर केले की, नवीन ह्युंदाई वेरना या कारला भारत न्यू कार असेसमेंट प्रोग्राम (भारत एनकॅप) अंतर्गत ५ स्टार सुरक्षा मानांकन मिळाले आहे. हे मानांकन मिळवणारी वेरना ही आपल्या श्रेणीतील पहिली कार ठरली आहे. भारतीय ग्राहकांना जागतिक दर्जाचे सुरक्षा तंत्रज्ञान आणि उत्कृष्ट अभियांत्रिकी गुणवत्ता प्रदान करण्याच्या ह्युंदाईच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेवर या यशामुळे पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

२७ नोव्हेंबरला पुणे महापालिकेत अभिरूप सभा

- उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या तीन प्रस्तावांना पक्षनेते सभेची मंजुरी
- वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त आणि चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि क्रीडा विषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांसंदर्भात उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी मांडलेल्या तीन महत्त्वपूर्ण प्रस्तावांना पक्षनेते सभेने मंजुरी दिली आहे. महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला, शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभागृहात विशेष अभिरूप सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. 'महात्मा ज्योतिराव फुले यांचे ऐतिहासिक व वैचारिक मार्गदर्शन' या संकल्पनेवर ही सभा आधारित असेल. या अभिरूप सभेत महात्मा फुले यांनी तत्कालीन काळात सभागृहात मांडलेले विचार, सादर केलेले ठराव आणि सामाजिक सुधारणांसाठी केलेले कार्य त्यांच्या भूमिकेतून सादर करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारांचा आणि ऐतिहासिक योगदानाचा परिचय नव्या पिढीला करून देणे हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

पुण्यात सीआयआय सरफेस कोटिंग शो २०२६ चे उद्घाटन



पुणे (आरंभ पर्व) : उत्पादनाची गुणवत्ता, टिकाऊपणा आणि कार्यक्षमता वाढविण्यामध्ये सरफेस कोटिंग तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असून, आधुनिक उत्पादन क्षेत्रात ते अविभाज्य घटक बनले आहे. बदलत्या औद्योगिक गरजांनुसार प्रगत कोटिंग तंत्रज्ञान, ऑटोमेशन, शाश्वत उत्पादन प्रक्रिया आणि स्वदेशी संशोधनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे, असे मत उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केले. चौथ्या सीआयआय नेक्सजेन मोबिलिटी शो २०२६ आणि सीआयआय सरफेस कोटिंग शो २०२६ च्या दुसऱ्या दिवशी, २० नोव्हेंबर रोजी पिंपरी-चिंचवड येथील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये सीआयआय सरफेस कोटिंग शो २०२६ चे उद्घाटन करण्यात आले. १९ ते २१ नोव्हेंबरदरम्यान आयोजित या प्रदर्शनात इलेक्ट्रिक मोबिलिटी, ऑटोमोबाईल तंत्रज्ञान, प्रगत कोटिंग्ज, सरफेस इंजिनिअरिंग आणि इंटेलिजंट मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान आणि उत्पादनांचे सादरीकरण करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना मदत मिळते, मग शेतमजुरांनी जगायचे कसे?

- दुष्काळात भूमिहीन शेतमजुरांच्या संसाराला आधार द्या!
- शेतमजुरांसाठी स्वतंत्र आर्थिक मदत, विमा, पेन्शन व रोजगार हमी योजना लागू करण्याची झोपडपट्टी सुरक्षा दलाची शासनाकडे मागणी



ज्यांच्या घामातून अन्नधान्य पिकते, त्यांच्याच घरात उपासमारीची वेळ येत असेल, तर अशा कष्टकऱ्यांना न्याय कधी मिळणार? शेतमजुरांच्या घामाला योग्य सन्मान आणि त्यांच्या कुटुंबाला आर्थिक सुरक्षितता मिळावी, यासाठी महाराष्ट्र शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, असे आवाहन झोपडपट्टी सुरक्षा दलाचे पुणे जिल्हाध्यक्ष दत्ता डाडर यांनी केले आहे

बारामती-केदार पाटोळे (दै. आरंभ पर्व)

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यानंतर शासनाकडून आर्थिक मदत जाहीर केली जाते. मात्र त्याच शेतात दिवसरात्र कष्ट करून शेती पिकवणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न कोण सोडवणार? शेतकऱ्यांना मदत मिळते, मग शेतमजुरांनी जगायचे कसे? असा सवाल उपस्थित करत पुणे झोपडपट्टी सुरक्षा दलाचे जिल्हाध्यक्ष दत्ता डाडर यांनी महाराष्ट्र शासनाकडे शेतमजुरांसाठी स्वतंत्र आर्थिक मदत योजना लागू करण्याची ठोस मागणी केली आहे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाचे जीवन अत्यंत कठीण झाले आहे. दुष्काळामुळे शेतीची कामे बंद पडतात, परिणामी रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या शेतमजुरांच्या हाताला काम मिळत नाही. घरखर्च, मुलांचे शिक्षण, औषधोपचार आणि अन्नधान्याची व्यवस्था करताना या कुटुंबांची मोठी आर्थिक ओढाताण होते. शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेतली जाते; मात्र शेतात राबणाऱ्या भूमिहीन मजुरांच्या हालअपेष्टांकडे शासनाने दुर्लक्ष करू नये. शेतमजुरांकडे स्वतःची शेती नाही, कोणतेही कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन नाही. त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केवळ रोजच्या मजुरीवर अवलंबून असतो. त्यामुळे दुष्काळाच्या काळात या घटकाला आर्थिक मदत मिळणे ही अत्यंत गरजेची बाब आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांतील भूमिहीन शेतमजुरांना थेट आर्थिक मदत द्यावी, त्यांना अपघाती व जीवन विमा संरक्षण मिळावे, वयोवृद्ध शेतमजुरांसाठी पेन्शन योजना सुरू करावी, दुष्काळी परिस्थितीत रोजगाराची हमी द्यावी, तसेच त्यांच्या कुटुंबांना अन्नधान्य व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. या मागण्यांसाठी शासनाने स्वतंत्र शासन निर्णय काढून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी दत्ता डाडर यांनी केली आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा संदर्भ देत ते म्हणाले की, ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून कष्टकरी आणि श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे. मग याच श्रमिकांच्या तळहाताला दुष्काळाच्या काळात आधार देण्याची जबाबदारी शासनाची नाही का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शेतमजूर हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यांच्या श्रमाशिवाय शेतीचे उत्पादन शक्य नाही. त्यामुळे शासनाने केवळ शेतकऱ्यांच्या मदतीपुरते धोरण मर्यादित न ठेवता शेतकऱ्यांसोबत शेतात राबणाऱ्या प्रत्येक भूमिहीन कष्टकऱ्याचाही विचार करावा.

- ७५ टक्के अनुदानावर शेळीपालन व कुक्कुटपालनाची संधी; सुरेखा हरगुडे यांचे आवाहन

आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे, शास्त्रीय पशुखाद्य व्यवस्थापनाची माहिती देणे, दुग्धव्यवसायाचे प्रशिक्षण देणे तसेच पशुपालनासाठी आवश्यक साहित्य व साधनसामग्री उपलब्ध करून देणे हा आहे. विशेषतः महिलांना कुक्कुटपालन आणि शेळीपालनाच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय सुरू करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची संधी मिळणार आहे. इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकृत योजनांसाठी https://zppunecessyojana.com/Default.aspx या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत. अर्ज मंजूर झाल्यानंतर अनुदानाची रक्कम पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने जमा करण्यात येणार आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२६ असून अधिक माहितीसाठी हवेली पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधावा.

फिटकू ठरला फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र २०२७ चा अधिकृत हायजीन पार्टनर

मुंबई (दै. आरंभ पर्व)

भारताचा पहिला तुरटी-आधारित पर्सनल केअर आणि हायजीन ब्रँड फिटकू ने फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र 2027 सोबत अधिकृत हायजीन पार्टनर म्हणून भागीदारी केली आहे. देशातील प्रमुख सौंदर्य आणि सौंदर्य स्पर्धा व्यासपीठांपैकी एकावर वैयक्तिक स्वच्छता आणि दैनंदिन सेल्फ-केअरशी संबंधित विषयांना प्राधान्य देण्याच्या दिशेने हे एक पाऊल आहे. याच्या माध्यमातून वैयक्तिक स्वच्छता आणि दैनंदिन काळजीबाबत जागरूकता वाढवली जाईल. ही भागीदारी फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र 2027 च्या संपूर्ण प्रवासादरम्यान सुरू राहील, ज्यामध्ये ऑडिशन, स्पर्धकांसोबतचा संवाद, उपांत्य फेरी आणि ग्रँड फिनाले अशा टप्प्यांचा समावेश असेल. या सहकार्याच्या माध्यमातून फिटकूचा उद्देश वैयक्तिक स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवणे आणि स्पर्धकांसोबतच प्रेक्षकांनाही दैनंदिन वैयक्तिक काळजीबाबत आपला विशेष दृष्टिकोन समजून सांगणे हा आहे. फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र 2027 च्या या सीझनमध्ये नोव्हेंबर 2026 ते जानेवारी 2027 या तीन महिन्यांच्या कालावधीत एकूण 10 कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. यादरम्यान मुंबई आणि पुणे येथे ऑडिशनचे आयोजन केले जाईल. या भागीदारीबाबत भाष्य करताना फिटकूच्या सह-संस्थापक नेहा मर्दा म्हणाल्या, "आपला आत्मविश्वास आपल्या त्वचेशी आणि व्यक्तिमत्त्वाशी सहज जोडलेला असतो. आम्हाला अभिमान आहे की आम्ही फेमिना मिस इंडिया महाराष्ट्रचा भाग आहोत, जे वैयक्तिक ओळख, आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षेचा उत्सव साजरा करते."

महिलांनी जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन योजनांचा लाभ घ्यावा!

उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)

जिल्हा परिषद पुणेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत पशुपालक आणि महिलांसाठी विविध वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होणार असून पशुपालकांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे परिसरातील पात्र महिला आणि पशुपालकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केसनंद-कोरेगावमूळ जिल्हा परिषद सदस्या सुरेखा रमेश हरगुडे यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत लोकनेते अजितदादा पवार पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रम, पशुपालकांना ७५ टक्के अनुदानावर शेळ्यांचा पुरवठा तसेच राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत महिलांना ७५ टक्के अनुदानावर कुक्कुटपालनासाठी ४०+१ सुधारित जातीच्या पक्ष्यांचा पुरवठा अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील पशुपालकांना पशुपालनाचे

जखमी नीलकंठ पक्ष्याला जीवदान!

मॉर्निंग वॉकला गेलेल्या 'सुप्रभात जयाद्री वॉकिंग ग्रुप'च्या सदस्यांची माणुसकी

इला फाउंडेशनच्या वन्यजीव रुग्णालयात उपचारासाठी दाखल

पुरंदर (दै. आरंभ पर्व)

जेजुरीच्या जयाद्री परिसरात जखमी अवस्थेत आढळलेल्या निसर्गसौंदर्याने नटलेल्या भारतीय नीलकंठ पक्ष्याला जीवदान देण्यासाठी स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवली. पायाला जखम झाल्याने झुडपात असहाय्य अवस्थेत पडलेल्या या पक्ष्याला भटक्या कुत्र्यांपासून तसेच अन्य शिकारी प्राण्यांपासून धोका निर्माण झाला होता. मात्र, 'सुप्रभात जयाद्री वॉकिंग ग्रुप'च्या सदस्यांनी प्रसंगावधान राखत या पक्ष्याची सुटका करून त्याला उपचारासाठी वन्यजीव रुग्णालयात दाखल केले. जेजुरी येथील चंद्रकांत नलवडे, संदीप झगडे, किरण बारभाई, पंढरी झगडे आणि राजा राठेकर हे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी जयाद्री परिसरात गेले असताना त्यांना झुडपात हा नीलकंठ पक्षी जखमी अवस्थेत आढळून आला. पक्ष्याच्या पायाला जखम झाली होती. त्याला व्यवस्थित हालचालही करता येत नव्हती. अशा अवस्थेत तो भटक्या कुत्र्यांचा किंवा अन्य शिकारी प्राण्यांचा सहज बळी ठरू शकतो, याची जाणीव सदस्यांना झाली.





वेळ न दवडता त्यांनी इला फाउंडेशन वन्यजीव, पक्षी-प्राणी संरक्षण व रुग्णालयाचे राजकुमार पवार यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर जखमी नीलकंठ पक्ष्याला सुरक्षितपणे त्यांच्या ताब्यात देत उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

भारतीय नीलकंठ (Indian Roller) हा आपल्या आकर्षक निळ्या रंगछटांमुळे ओळखला जाणारा सुंदर पक्षी आहे. नीलकंठ पक्ष्यांच्या विविध प्रजाती व उपप्रजातींचे अधिवास आणि स्थलांतराचे स्वरूप वेगवेगळे आहे. काही स्थलांतरित रोलर पक्षी थंडीच्या काळात युरोपमधून उबदार प्रदेशांकडे प्रवास करतात. काश्मीर खोऱ्यातून दक्षिणेकडे होणाऱ्या पक्ष्यांच्या हंगामी स्थलांतराचाही अभ्यास महत्त्वाचा आहे. जयाद्री-सह्याद्री परिसरातील जैवविविधतेच्या दृष्टीने अशा पक्ष्यांचे संरक्षण आवश्यक आहे.

पक्ष्यांच्या अधिवासाचे संरक्षण, झाडे-झुडपे जपणे आणि जखमी वन्यजीव आढळल्यास त्यांना स्वतः उपचार करण्याऐवजी प्रशिक्षित वन्यजीव बचाव पथकाच्या मदतीने रुग्णालयात पोहोचवणे गरजेचे आहे.

'सुप्रभात जयाद्री वॉकिंग ग्रुप'च्या सदस्यांनी दाखवलेली ही संवेदनशीलता पक्षीप्रेमी आणि निसर्गप्रेमींसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरली आहे. मॉर्निंग वॉकच्या निमित्ताने निसर्गाशी जोडलेले नागरिक वन्यजीवांच्या मदतीसाठीही पुढे येत असल्याने परिसरात त्यांच्या कृतीचे कौतुक होत आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६
३



दंतोपचाराचा सरकारी आरोग्य योजनांमध्ये समावेश करण्यासाठी प्रयत्नशील

इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीतर्फे अत्याधुनिक दंतोपचारावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन



पुणे (दै. आरंभ पर्व)

"दंतोपचारांना सरकारी आरोग्य योजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार आहे. केंद्र सरकारची आयुष्यमान भारत योजना व राज्य सरकारच्या महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजना आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी यातून दंतोपचार मोफत किंवा सवलतीच्या दरात होतील, यासाठी प्रयत्नशील आहे," असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीतर्फे (आयएसडीडी) अत्याधुनिक दंतचिकित्सा व दंतरोपण या विषयावरील तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. बालेवाडी येथील हॉटेल ऑर्किड येथे झालेल्या कार्यक्रमावेळी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज आणि ॲग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) महासंचालक प्रशांत गिरबाने, 'आयएसडीडी'चे अध्यक्ष डॉ. रत्नदीप जाधव, संस्थापक अध्यक्ष डॉ. पंकज चिवटे, सचिव डॉ. विजय ताम्हाणे, संचालक व खजिनदार डॉ. कौस्तुभ पाटील, डॉ. विपीन माहूरकर आदी उपस्थित होते. या परिषदेमध्ये देश-विदेशातील ६०० ते ७०० दंतवैद्यक सहभागी झाले आहेत. चंद्रकांत पाटील म्हणाले, "आजही भारतात दंतोपचार हे 'लक्झरी' उपचार मानले जातात, त्यामुळे ते न परवडणारा मोठा वर्ग आपल्या आजुबाजूला आहे. अशांसाठी दंतोपचार कमीत कमी खर्चात व्हावेत यासाठी आम्ही मागील बऱ्याच काळापासून प्रयत्नशील आहोत. सध्या आपल्याकडे 'एमएनजीएल'च्या माध्यमातून दोन मोबाईल व्हॅन कार्यरत असून त्याव्दारे आपण गरीब व गरजू रुग्णांना दंतोपचारांसह इतर आरोग्य सुविधा पुरवत आहोत. वस्ती भागातील नागरीकांना याचा चांगला फायदा होत असून येत्या काळात आपण ही सुविधा आणखी वाढविण्याचा प्रयत्न करणार आहोत."

प्रशांत गिरबाने म्हणाले, गेल्या काही वर्षात भारताने तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्वच क्षेत्रात वेगाने प्रगती केली आहे. यामध्ये डिजिटल हेल्थचाही सहभाग असून दंतोपचारांतील डिजिटल क्रांती वाखाणण्याजोगी आहे. येत्या काळात तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर दंतवैद्यांसाठी प्रगतीचा मार्ग ठरेल. वैद्यक क्षेत्रात वाढलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे आरोग्य सुविधा अधिक जलद, सोप्या व सहज होत आहेत. डिजिटल इंडियामुळे लाभार्थ्यांना थेट मदत मिळणे शक्य होत आहे. आरोग्य क्षेत्रात भारत आत्मनिर्भर व्हायचा असेल, तर आपल्याला अधिक प्रमाणात संशोधन, इनोव्हेशन करावे लागेल. या आंतरराष्ट्रीय परिषदेतून या कार्याला गती मिळत असून अजूनही मोठे काम व्हायला हवे.

डॉ. रत्नदीप जाधव यांनी प्रास्ताविकात सांगितले की, या परिषदेच्या माध्यमातून डिजिटल डेन्टिस्ट्रीचा प्रचार व प्रसार करण्याचा उद्देश आहे. परिषदेत अत्याधुनिक मशिनरी, विविध प्रगत संगणक प्रणाली, थ्रीडी प्रिंटिंग, स्कॅनिंग, रोबोटिक सारख्या नव्या दंतोपचार व दंतरोपण उपचारांवर चर्चा झाली. दंतोपचारावरील उपकरणे बनवणाऱ्या कंपन्या व दंतवैद्यांना एकत्र आणण्यासाठी ही परिषद महत्वपूर्ण ठरेल. भारतात सध्या मोठ्या प्रमाणात नावीन्यपूर्ण संशोधन होत असून महाराष्ट्राचाह त्यात महत्त्वाचा वाटा आहे. मागील काही वर्षात परिषदेला मार्गदर्शन करणाऱ्या तज्ज्ञांमध्ये भारतीय तज्ज्ञांचा सहभाग वाढत आहे ही आनंदाची बाब आहे.

या परिषदेत देशविदेशातून आलेल्या तज्ज्ञ दंतवैद्यकांची मार्गदर्शनपर सत्रे झाली. परिषदेच्या निमित्ताने दंतचिकित्सा व दंतरोपणातील आधुनिक तंत्रज्ञान व उपकरणांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. वैशाली वर्मा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर डॉ. कौस्तुभ पाटील यांनी आभार मानले.

थोडक्यात पण महत्वाचे



लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेत दिवाळी फराळ स्नेहमेळावा उत्साहात

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : शुभ दीपावलीच्या मंगलमय पर्वानिमित्त आपुलकीच्या स्नेहबंधांना उजाळा देण्यासाठी आणि आनंदाचे क्षण एकत्रितपणे साजरे करण्याच्या उद्देशाने लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर - शाखा उरुळी कांचन यांच्या वतीने दिवाळी फराळाच्या छोटेखानी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहमेळाव्याला संस्थेचे सल्लागार, सभासद, खातेदार व ठेवीदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी संस्थेचे संचालक शिवाजी माळी, पुणे विभागीय विस्तार अधिकारी कमलाकर पाटील, शाखाधिकारी अभिजित साखरे, कर्मचारी मयुरी बोडके, मृणाल कांचन, सोनाली वाले, अनिकेत जगताप, महेश फुलझळके, सल्लागार अक्षदा कांचन, शुभांगी परिट, अलका मदने, नंदकुमार मुरकुटे, अशोक कदम, रतिकांत यादव, डॉ. रवींद्र भोळे, सुरेश सातव, दत्तात्रय जवळकर यांच्यासह संस्थेचे सभासद व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे संचालक शिवाजी माळी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संस्थेचे संस्थापक आमदार सुभाषबापू देशमुख तसेच संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ यांच्या सक्षम नेतृत्वाखाली संस्थेचा कारभार पारदर्शकपणे सुरू आहे. दिवाळी फराळासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून सभासद, खातेदार आणि हितचिंतकांशी आपुलकीचे नाते अधिक दृढ होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने उपस्थितांनी एकमेकांना दीपावलीच्या शुभेच्छा देत आनंदाचे क्षण साजरे केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखाधिकारी अभिजित साखरे यांनी केले.

इंदापुरात २५ नोव्हेंबरला राजकीय संघर्षाचा महासंग्राम!

- 'तहसीलदार हटाव' विरुद्ध 'तहसीलदार बचाव'; एकाच दिवशी दोन महामोर्चे, तालुक्याचे राजकारण तापले!

इंदापूर (आरंभ पर्व) : इंदापूर तालुक्यात सध्या तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या भूमिकेवरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, २५ नोव्हेंबर रोजी एकाच दिवशी दोन परस्परविरोधी महामोर्चे निघणार असल्याने तालुक्यात अभूतपूर्व राजकीय संघर्षाची चिन्हे दिसू लागली आहेत. एका बाजूला 'तहसीलदार हटाव'ची मागणी, तर दुसऱ्या बाजूला 'तहसीलदार बचाव'चा नारा दिला जात असल्याने इंदापूरच्या राजकारणात नवा संघर्ष उभा राहिला आहे. भारतीय जनता पार्टीसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट), मनसे, शिवसेना (शिंदे गट), रयत क्रांती सेना तसेच विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत तहसीलदारांच्या विरोधात महामोर्चाचे आयोजन केले आहे. तहसील कार्यालयात सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि गोरगरीब जनतेची कामे वेळेत होत नसल्याचा, नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याचा तसेच कार्यालयातील कथित भ्रष्टाचाराचा आरोप आंदोलकांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून तहसीलदारांचे तात्काळ निलंबन करावे, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. दरम्यान, या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट), महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष आणि युथ पँथर फोर्स यांनी तहसीलदारांच्या समर्थनार्थ प्रतिमोर्चाची घोषणा करत प्रत्युत्तर दिले आहे. तहसीलदार जीवन बनसोडे हे सर्वसामान्यांची कामे योग्य पद्धतीने करीत असल्याचा दावा समर्थकांनी केला आहे. तसेच एसआयआर प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांवर कारवाई होण्याची शक्यता असल्याने ती रोखण्यासाठी आणि तहसीलदारांवर दबाव आणण्यासाठीच विरोधकांकडून मोर्चाचे आयोजन केले जात असल्याचा गंभीर आरोप अजित पवार गटाने केला आहे. त्यामुळे या वादाला आता राजकीय रंग चढला आहे. कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी भाजपवर मतदानातील कथित हेराफेरीवरून केलेले ट्विट, तसेच ॲड. राहुल मखरे आणि भाजप कार्यकर्ते कोकाटे यांच्यातील कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने राजकीय चर्चांना आणखी उधाण आले आहे. या घडामोडींमुळे तहसीलदारांच्या समर्थनार्थ आणि विरोधातील आंदोलनाचा विषय आता केवळ प्रशासकीय न राहता राजकीय प्रतिष्ठेचा बनत चालला आहे.

राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत यशराज जवळकरची सुवर्ण कामगिरी!

इंदापूर-अक्षय यादव (दै. आरंभ पर्व)



- २५ मीटर पिस्तूल नेमबाजीत दोन पदकांची कमाई; रौप्य आणि कांस्य पदक पटकावत महाराष्ट्रात उमटवला ठसा!

महाराष्ट्र राज्य नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेतर्गत गोवा येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय पिस्तूल नेमबाजी स्पर्धेत इंदापूर तालुक्यातील लाखेवाडी येथील जय भवानीगड विकास प्रतिष्ठान संचलित विद्यानिकेतन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या यशराज रघुनाथ जवळकर याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. २५ मीटर पिस्तूल युवा पुरुष गटात रौप्यपदक, तर २५ मीटर पिस्तूल ज्युनिअर पुरुष गटात कांस्यपदक अशी दोन पदके पटकावत त्याने संस्थेसह इंदापूर तालुक्याचा नावलौकिक वाढविला आहे. यशराज हा विद्यानिकेतन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, लाखेवाडी येथे प्रथम वर्ष सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबतच नेमबाजीसारख्या कौशल्यपूर्ण क्रीडा प्रकारात सातत्य, अचूकता आणि मेहनतीच्या जोरावर त्याने मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरत आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत दोन पदकांची कमाई करून त्याने आपल्या गुणवत्तेची प्रभावी छाप पाडली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल जय भवानीगड विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीमंत ढोले सर, उपाध्यक्षा डॉ. चित्रलेखा ढोले, मुख्य सल्लागार प्रदीपजी गुरव, सचिव हर्षवर्धनजी खाडे, सहसचिव ऋषिकेश ढोले, विश्वस्त पृथ्वीराज ढोले यांनी यशराजचे विशेष अभिनंदन केले. तसेच विद्यानिकेतन इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. आशिष जोशी, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सम्राट खेडकर, विद्यानिकेतन स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य गणेश पवार, प्रेसिडेन्सी इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य राजेंद्र सरगर यांच्यासह संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे कौतुक करून पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची क्षमता आहे, हे यशराज जवळकर याने आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे. त्याच्या या दुहेरी पदकविजेत्या यशामुळे लाखेवाडी परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पंढरीनाथ सुक्रे यांच्या कुटुंबासाठी मित्रांनी उभारला मदतनिधी

आंबेगाव (दै. आरंभ पर्व)



खडकवाडी ता. आंबेगाव येथील पंढरीनाथ किसन सुक्रे (वय ४४ वर्ष) यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या कुटुंबाच्या मदतीसाठी मित्रांनी पुढाकार घेत दशक्रियेच्या दिवसापर्यंत तब्बल पावणेपाच लाख रुपयांचा मदतनिधी जमा केला. मित्रांच्या या माणुसकीच्या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

दिवाळी सणात लक्ष्मीपूजनाच्या दिवशी (दि. ८) नोव्हेंबर रोजी जुन्नर तालुक्यातील औरंगपूर ते पारगाव (मंगळूर) रस्त्यावर झालेल्या अपघातात पंढरीनाथ सुक्रे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. वयाच्या अवघ्या ४४ व्या वर्षी त्यांचे निधन झाल्याने सुक्रे कुटुंबावर दुःखाचा मोठा आघात झाला. त्यांच्या मागे पत्नी एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. सुक्रे कुटुंब औरंगपूर येथे शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. घरातील कर्ता पुरुष हरपल्याने कुटुंबासमोर भविष्यातील आर्थिक जबाबदाऱ्यांचा प्रश्न निर्माण झाला.

घरातील कर्ता पुरुष काळाच्या पडद्याआड गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा कठीण प्रसंगी दुःखात सहभागी होण्याबरोबरच मित्राच्या कुटुंबाला आर्थिक आधार देण्यासाठी मित्रपरिवार एकवटला माजी सरपंच अनिल डोके, माजी उपसरपंच एकनाथ सुक्रे, सोमनाथ सुक्रे, विठ्ठल सुक्रे, धनंजय शिंदे, संतोष राम सुक्रे, नाथा सुक्रे, विशाल वाळुंज यांनी पुढाकार घेऊन सोशल मिडीयाच्या माध्यमातून आवाहन करत मदतीचा संकल्प केला. मित्रपरिवारातील प्रत्येकाने आपापल्या परीने ५०० रुपयांपासून ते पाच हजार रुपयांपर्यंत आर्थिक योगदान देत मदतनिधी जमा करण्यास सुरुवात केली. विशेष म्हणजे दशक्रियेच्या दिवसापर्यंत मित्रांनी एकजुटीने प्रयत्न करून पावणेपाच लाख रुपयांची रक्कम जमा केली. यामध्ये प्रामुख्याने पुणे म्हाडाचे सभापती , माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे परदेशात असतानाही २१ हजार रुपयांची मदत जाहीर केली, खडकवाडीतील माजी विद्यार्थी ५८ हजार रुपये, विशाल वाळुंज मित्र मंडळाच्या वतीने ५१ हजार रुपये मदत व दोन्ही मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली, दत्तात्रय बाबुराव पोखरकर - २१ हजार रुपये, औरंगपूर मित्र मंडळ - १८ हजार रुपये, मोरया प्रतीष्ठानचे संस्थापक रमेश येवले- १५ हजार रुपये, सुभाष लंके - १५ हजार रुपये, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अरुण गिरे- पाच हजार रुपये, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख सुरेश भोर - पाच हजार रुपये, अतुल डोके - पाच हजार रुपये यांच्या सह एकूण पावणेपाच लाख रुपये मदत जमा झाली हि रक्कम स्वर्गीय पंढरीनाथ सुक्रे यांच्या पत्नीच्या नावे बँकेत मुदतठेवी मध्ये ठेवणार असल्याचे अनिल डोके यांनी सांगितले.

मुलांनी आईचे चारधाम यात्रेचे स्वप्न केले साकार!

शिरूर (दै. आरंभ पर्व)



आईच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी मुलांनी घेतलेला पुढाकार हा खऱ्या अर्थाने मातृप्रेमाचा सुंदर आदर्श ठरला आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, शिरूरचे माजी सहसचिव प्रभाकर राऊतमारे यांच्या पत्नी प्रतिभा प्रभाकर राऊतमारे यांची चारधाम यात्रा करण्याची अनेक वर्षांची इच्छा त्यांच्या मुलांनी पूर्ण केली. २०२२, २०२३ आणि २०२६ या तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने चारही धामांचे दर्शन घडवून आईचे स्वप्न साकार करण्यात आले. या यात्रेत जगन्नाथपुरी, द्वारका, रामेश्वरम आणि बद्रीनाथ या चार प्रमुख तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेण्यात आले. मोठे चिरंजीव . गणेश यांनी तीन धामांची, तर लहान चिरंजीव कपिल यांनी एका धामाची यात्रा घडवून आणली.मुले सुना आणि नातवंडे यांच्या सहवासात ही संपूर्ण यात्रा आनंदात पार पडली. प्रवासासाठी हवाई तसेच रेल्वे मार्गाचा वापर करण्यात आला.

पालकांपुढे मोठे आव्हान; मुले मोबाईलमध्ये रममाण

पुणे (दै. आरंभ पर्व)

- मुलांच्या हातातील मोबाईल कमी करून संवाद, संस्कार आणि कुटुंबातील नात्यांना द्यावे प्राधान्य

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. मात्र याच मोबाईलच्या अतिवापरामुळे लहान मुलांपासून किशोरवयीन मुलांपर्यंत अनेक मुले मोबाईलच्या आहारी जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. ही बाब पालकांसाठी चिंतेचा आणि समाजासाठी विचार करण्याचा विषय बनली आहे. पूर्वी घरामध्ये आजी-आजोबांच्या गोष्टी, कुटुंबातील गप्पा, मित्रांसोबत खेळ आणि पाहुण्यांचे हसतमुखाने स्वागत असे आनंदी वातावरण असायचे. मात्र आज अनेक घरांमध्ये मुले मोबाईल, गेम्स, यूट्यूब आणि सोशल मीडियामध्ये रममाण झालेली दिसतात. घरात पाहुणे आले तरी त्यांच्याशी संवाद साधण्याऐवजी मुले मोबाईलमध्ये व्यस्त राहतात. आई-वडिलांशी मनमोकळेपणाने बोलणे, घरातील जबाबदाऱ्या समजून घेणे आणि सामाजिक नात्यांमध्ये सहभागी होणे याकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे.या परिस्थितीला केवळ मुलांना दोष देऊन चालणार नाही. पालकांनीही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. मुलांसमोर आपण स्वतः किती वेळ मोबाईल वापरतो, याचाही विचार केला पाहिजे. मुलांना मोबाईलपासून दूर ठेवण्यासाठी त्यांच्यावर बंधने लादण्यापेक्षा त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संवाद साधणे अधिक महत्त्वाचे आहे. पालकांनी दररोज कुटुंबासाठी काही वेळ राखून ठेवावा. एकत्र जेवण, मैदानी खेळ, वाचन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि कौटुंबिक गप्पा यांना प्राधान्य द्यावे. मुलांच्या आवडी-निवडी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करावे. मोबाईल वापरासाठी वयानुसार मर्यादा निश्चित कराव्यात.मोबाईल हे ज्ञानाचे साधन आहे, पण त्याचा अतिरेक मुलांच्या सर्वांगीण विकासात अडथळा ठरू शकतो.आज गरज आहे ती मुलांच्या हातातील मोबाईल काढून घेण्यापेक्षा त्यांच्या मनातील अंतर कमी करण्याची. मुलांना महागड्या वस्तूंपेक्षा पालकांचा वेळ, प्रेम, संस्कार आणि योग्य मार्गदर्शन अधिक आवश्यक आहे. चला, मोबाईलच्या आहारी गेलेल्या पिढीला संवादाची, संस्कारांची आणि माणुसकीची ओळख करून देऊया!

- समाजप्रेरक सुजाताताई गुरव

शिवजन्मभूमी प्रतिष्ठानच्या किल्ले बनविणे स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद!

जुन्नर शहरात साकारले २१ आकर्षक किल्ले; दिल्ली पेठेने पटकाविला प्रथम क्रमांक



'सुवर्ण यात्रा' संगीत सोहळ्याचे आयोजन

जुन्नर : महेश कदम (दै. आरंभ पर्व)

छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने शिवजन्मभूमी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या किल्ले बनविणे स्पर्धेला जुन्नर शहरातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत शहरातील विविध भागांतून तब्बल २१ आकर्षक किल्ल्यांची निर्मिती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी तोरणा, रायगड, शिवनेरी यांसह विविध ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या हुबेहूब प्रतिकृती साकारत आपल्या कल्पकतेचे आणि कलागुणांचे दर्शन घडविले. या स्पर्धेत दिल्ली पेठेने प्रथम क्रमांक पटकाविला.

विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समजावा, गड-किल्ल्यांची माहिती व्हावी आणि ऐतिहासिक वारशाबद्दल त्यांच्यामध्ये आवड निर्माण व्हावी, हा या स्पर्धेच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश असल्याचे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष रवी शेठ खिल्लारी यांनी सांगितले.

स्पर्धेच्या परीक्षणादरम्यान विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ आणि आकर्षक किल्ल्यांची निर्मिती कशी केली, याची माहिती परीक्षकांनी जाणून घेतली. तसेच संबंधित किल्ल्यांचा इतिहास, भौगोलिक रचना आणि ऐतिहासिक महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यात आले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने दिलेल्या उत्तरांमधून त्यांचा इतिहासाचा अभ्यास आणि शिवकालीन गड-किल्ल्यांविषयी असलेले ज्ञान दिसून आले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक दिल्ली पेठ (५ हजार रुपये व सन्मानचिन्ह), द्वितीय क्रमांक रोकडे मारुती मंदिर (३ हजार रुपये व सन्मानचिन्ह) आणि तृतीय क्रमांक सागर गिरणा सोसायटी (२ हजार रुपये व सन्मानचिन्ह) यांनी पटकाविला. विजेत्यांना रोख पारितोषिकांसह सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार असून, स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांचाही सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. शिवजन्मभूमी प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून प्रतिष्ठान सातत्याने समाजाभिमुख कार्य करीत असते. यावर्षी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रुपेश जगताप, उपाध्यक्ष डॉ. स्वानंद देशपांडे, सचिव प्रशांत देवणे सर, सहसचिव संजय शेठ चिखले, खजिनदार सचिन कदम यांच्यासह सदस्य संजय शेठ वव्हाडी, अनिल शेठ रोकडे, ओंकार जोशी, स्वप्निल कर्नावट, सतीश शेठ कवडे, गुरुनाथ शेठ चव्हाण, विनय शेठ वाबळे, डॉ. भगत, बाळासाहेब तेलोरे सर, जालिंदर रासकर, आशिष पांडव आदी उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण प्रफुल्ल बोराडे सर, तेलोरे सर आणि देवणे सर यांनी केले.

२४ नोव्हेंबरला बक्षीस वितरण

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता जुन्नर येथील पाच रस्ता, श्री शिवाजी महाराज चौक येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून स्वरांजली मंच प्रस्तुत स्थानिक कलाकारांचा 'सुवर्ण यात्रा' हा भव्य संगीत सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या बक्षीस वितरण समारंभासह संगीत कार्यक्रमाला जुन्नरकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवजन्मभूमी प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

धर्मशास्त्राला धरूनच तंत्रशास्त्राच्या माध्यमातून खंडोबा मंदिराचा विकास व्हावा !

जेजुरी ग्रामस्थांची आग्रही मागणी; पुरातत्त्व विभाग आणि ग्रामस्थांमध्ये सुसंवादाची भूमिका

पुरंदर (दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्राचे कुलदैवत आणि राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जेजुरीच्या श्री खंडोबा मंदिराचा विकास करताना येथील शेकडो वर्षांच्या धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचा आदर राखला जावा. धर्मशास्त्राला धरूनच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मंदिराचा आणि गडकोटाचा विकास करण्यात यावा, अशी आग्रही मागणी जेजुरी ग्रामस्थांनी केली आहे. मंदिराच्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन, संवर्धन आणि दर्जेदार दुरुस्ती करताना स्थानिक ग्रामस्थ, नगरपालिका, देवस्थान संस्था आणि परंपरागत सेवेकऱ्यांना विश्वासात घ्यावे, अशी भूमिका ग्रामस्थ प्रतिनिधींनी पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर मांडली.



जेजुरीच्या खंडोबा मंदिराला शेकडो वर्षांची धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. येथील यात्रा, उत्सव, सण, धार्मिक विधी आणि विविध रूढी-परंपरांच्या माध्यमातून गुरव, पुजारी, वीर, कोळी, घडशी, ब्राह्मण, ग्रामस्थ, खांदेकरी, मानकरी, सेवेकरी अशा अठरापगड जाती-धर्मांतील उपासकांनी ही मंदिर संस्कृती आजतागायत जतन केली आहे. या प्राचीन परंपरांच्या पाऊलखुणा मंदिराच्या स्थापत्यशास्त्रीय रचनेतून आजही स्पष्टपणे दिसून येतात. गडावरील प्रत्येक दगड या ऐतिहासिक वैभवाची साक्ष देत उभा आहे. सध्या शासनाच्या पुरातत्त्व विभागामार्फत विकास निधीतून खंडोबा गड, गडकोट, पायरी मार्ग, दर्शन मंडप तसेच विविध वास्तूंची डागडुजी आणि संवर्धनाची कामे आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरू आहेत. मात्र, या कामांमध्ये काही ठिकाणी ऐतिहासिक वास्तूंचे मूळ दगड मजबूत आणि टिकाऊ असतानाही ते बदलून नवीन दगड वापरण्यात आल्याचा आक्षेप ग्रामस्थांनी घेतला आहे. काही कामांचा दर्जाही समाधानकारक नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ऐतिहासिक वास्तूंचे मूळ स्वरूप कायम ठेवून पारंपरिक स्थापत्यकलेनुसारच त्यांची दुरुस्ती आणि संवर्धन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

जेजुरीच्या नव्या गडापासून जुन्या कडेपठार मंदिरापर्यंतच्या पारंपरिक पालखी प्रदक्षिणा मार्गासह जेजुरी पंचक्रोशीतील ऐतिहासिक मूर्ती, वास्तू आणि छोटी मंदिरे यांचेही शास्त्रीय पद्धतीने जतन होणे आवश्यक आहे. या वारशाचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही पुरातत्त्व विभागाची महत्त्वाची जबाबदारी असून, या कामांमध्ये होणारी दिरंगाई आणि कामांच्या दर्जाबाबत ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

यासंदर्भात छत्री मंदिर येथे ग्रामस्थ आणि पुरातत्त्व विभागाचे प्रमुख अधिकारी यांच्या नियोजित सुसंवाद बैठकीत जेजुरी नगराध्यक्ष जयदीप बारभाई आणि सामाजिक कार्यकर्ते हरिदास रत्नपारखी यांनी समस्त ग्रामस्थांच्या वतीने भूमिका मांडली. शासनाचे प्रशासन आणि देवस्थान समित्यांची सध्याची व्यवस्था अस्तित्वात येण्यापूर्वीपासूनच ग्रामस्थ, उपासक आणि भाविकांनी येथील धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा शेकडो वर्षे जतन केल्या आहेत. त्यामुळे मंदिराचा विकास करताना या परंपरागत ज्ञानाचा आणि स्थानिकांच्या अनुभवाचा विचार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. खंडोबा गड आणि जुने कडेपठार येथील पारंपरिक पालखी प्रदक्षिणा मार्गाची दुरुस्ती, डागडुजी आणि भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करताना स्थानिक नगरपालिका, समस्त ग्रामस्थ मंडळे, देवस्थान संस्था आणि संबंधित समित्यांना विश्वासात घेऊनच कामे करण्यात यावीत, अशी आग्रही मागणीही यावेळी करण्यात आली.

या बैठकीत पुरातत्त्व विभागाचे प्रमुख अधिकारी डॉ. विलास वहाणे यांनी जुन्या कडेपठार मंदिराच्या शिखर निर्मितीबाबत तसेच नव्या गडाच्या विकास आराखड्याबाबत माहिती दिली. प्रस्तावित विकासकामांची दिशा आणि संवर्धनाच्या नियोजनासंदर्भातही त्यांनी उपस्थितांना माहिती दिली.

या सुसंवाद बैठकीस नगराध्यक्ष जयदीप बारभाई, श्री मार्तंड देवसंस्थानचे माजी अध्यक्ष मंगेश घोणे , खांदेकरी-मानकरी जालिंदर खोमणे, इनामदार सचिन पेशवे, राजेंद्र पेशवे, कडेपठारचे अधिकृत ट्रस्टी प्रतिनिधी मंगेश आगलावे, योगेश मोरे, गणेश आगलावे, माजी ट्रस्टी सुधीर गोडसे, गणेश दरेकर, सतीश गाडगे, दिलीप आगलावे, मनोज मोहिते, हरिभाऊ रत्नपारखी, बंडोपंत घुणे, संतोषआबा खोमणे, शैलेश राऊत, छबन कुदळे यांच्यासह खोमणे, भापकर, माळवदकर, मोरे, थोरात आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

तसेच जेएनपीए सदस्य अस्लम पानसरे, राहुल घाडगे, मोहरकर, कुदळे, लाखे, हेमंत सोनवणे, सदानंद बारभाई आणि विविध ग्रामस्थ संस्था व प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थितांनी विविध विषयांवर आपली मते मांडत ऐतिहासिक वारसा जतन करूनच मंदिर विकासकामे करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

परंपरा जपून विकासाचा आग्रह

मंदिराचा विकास हा केवळ दगड, सिमेंट आणि आधुनिक सुविधांपुरता मर्यादित नसून, त्यामागील धार्मिक अधिष्ठान, स्थापत्यशास्त्र, लोकपरंपरा आणि ऐतिहासिक वारसा जपणारा असावा. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना प्राचीन वास्तूंचे मूळ स्वरूप आणि धार्मिक प्रथा-परंपरांना धक्का लागता कामा नये. गडकोट आणि दोन्ही मंदिरांच्या विकासकामांमध्ये पारंपरिक ज्ञान व आधुनिक तंत्रशुद्ध पद्धती यांचा समन्वय साधून दर्जेदार कामे व्हावीत, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी शासन आणि पुरातत्त्व विभागाकडे व्यक्त केली.

थोडक्यात पण महत्वाचे

रत्नागिरी जेट्सची पुण्यात पहिली क्रिकेट अकादमी सुरू!



पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र प्रीमियर लीगमध्ये (एमपीएल) दोन वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या रत्नागिरी जेट्सने महाराष्ट्रातील नवोदित क्रिकेटपटूंना घडविण्याच्या उद्देशाने पुण्यातील वडगाव बुद्रुक येथे आपली पहिली अधिकृत क्रिकेट अकादमी सुरू करण्याची घोषणा केली आहे. सिल्व्हर बर्च व्हिजन स्पोर्ट्स अॅकॅडमीच्या सहकार्याने सुरू करण्यात येणाऱ्या या अकादमीच्या माध्यमातून तळागाळातील गुणवंत खेळाडूंना व्यावसायिक क्रिकेटपर्यंत पोहोचण्यासाठी सुसंरचित प्रशिक्षण आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. रत्नागिरी जेट्सच्या क्रिकेट विकास उपक्रमातील हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. अलीकडेच फ्रँचायझीने १६ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील वयोगटांसाठी प्रतिभा निवड चाचण्या घेतल्या होत्या. या चाचण्यांना ७०० हून अधिक इच्छुक क्रिकेटपटूंनी प्रतिसाद दिला. या पार्श्वभूमीवर नव्या अकादमीच्या माध्यमातून वर्षभर प्रशिक्षण आणि खेळाडूंच्या कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. भविष्यात महाराष्ट्रातील प्रमुख भागांमध्ये अशा आणखी अकादमी सुरू करण्याचीही फ्रँचायझीची योजना आहे. या अकादमीमध्ये सात वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या मुला-मुलींना प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. १४, १६, १९ आणि २३ वर्षांखालील वयोगटांसाठी स्वतंत्र विकास कार्यक्रम राबविण्यात येणार असून, खेळाडूंना वरिष्ठ क्लब क्रिकेट, फ्रँचायझीचे पुरुष आणि महिला संघ तसेच उच्चस्तरीय टी-२० स्पर्धांपर्यंत पोहोचण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. जेटसिंथेसिसचे अध्यक्ष आणि रत्नागिरी जेट्सचे सहमालक राजन नवानी म्हणाले की, चॅम्पियन खेळाडू एका रात्रीत घडत नाहीत. गुणवत्तेची ओळख, सातत्यपूर्ण प्रशिक्षण, योग्य संधी आणि उत्कृष्टतेकडे नेणारी व्यवस्था यांमधून खेळाडू घडतात. तळागाळातील प्रतिभेला व्यावसायिक क्रिकेटमध्ये संधी मिळवून देण्यासाठी रत्नागिरी जेट्स प्रयत्नशील आहे.

बाइक टॅक्सी सेवांना सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा

- रॅपिडोकडून ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत!
- कर्नाटक सरकारची विशेष अनुमती याचिका फेटाळली
- बाइक टॅक्सींच्या नियमनासाठी राज्यस्तरीय धोरणाचा मार्ग मोकळा

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

देशातील बाइक टॅक्सी सेवांच्या भवितव्याच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे रॅपिडो (Rapido) कंपनीने स्वागत केले आहे. कर्नाटक बाइक टॅक्सी प्रकरणात राज्य सरकारने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका (SLP) सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. या निर्णयामुळे बाइक टॅक्सी क्षेत्राला कायदेशीर स्पष्टता मिळण्यास मदत होणार असून, राज्यस्तरावर या सेवांचे नियमन आणि जबाबदार विस्तार करण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे. भारतातील शहरी वाहतूक व्यवस्थेत बाइक टॅक्सी सेवा महत्त्वाची ठरत आहे. विशेषतः कमी अंतराचा प्रवास, वाहतूक कोंडीतून जलद मार्गक्रमण तसेच मेट्रो, बस आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेपर्यंत पोहोचण्यासाठी बाइक टॅक्सी प्रभावी पर्याय ठरत आहेत. यामुळे प्रवाशांना परवडणारी वाहतूक सुविधा मिळण्याबरोबरच लाखो बाइक टॅक्सी कॅप्टन्सना उत्पन्नाचे लवचीक साधन उपलब्ध झाले आहे. रॅपिडोचे सह-संस्थापक पवन गुंटुपल्ली यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, या निकालामुळे कर्नाटकातील बाइक टॅक्सी सेवांबाबत आवश्यक स्पष्टता निर्माण झाली आहे. बाइक टॅक्सी सेवांनी गर्दीच्या शहरांमध्ये प्रवाशांची सोय, फर्स्ट आणि लास्ट माइल कनेक्टिव्हिटी तसेच चालकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. न्यायालयाच्या निर्णयामुळे या क्षेत्राच्या भविष्यातील विकासासाठी भक्कम पाया निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांना योजनांपासून वंचित ठेवू नका : सिमाताई भुजबळ

- अपत्य प्रतिज्ञापत्राच्या अटीत सवलत द्या!
- ७५ टक्के अनुदानाच्या योजनांचा लाभ गरजू शेतकऱ्यांना मिळावा



जेजुरी (दै. आरंभ पर्व)

जिल्हा परिषद निधी योजना २०२६-२७ अंतर्गत पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी लागू असलेल्या अपत्य प्रतिज्ञापत्राच्या अटीत सवलत देऊन गरजू शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी सरपंच संघटना पुरंदर तालुका महिला अध्यक्षा तथा माजी सरपंच सिमाताई भुजबळ यांनी केली आहे.

शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. अनियमित पाऊस, पाण्याची टंचाई, शेतमालाला हमीभावाचा अभाव आणि दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरत आहेत. मात्र, केवळ एका कागदपत्राच्या अटीमुळे पात्र आणि गरजू शेतकरी या योजनांच्या लाभापासून वंचित राहत असतील, तर शासनाने या अटीचा फेरविचार करणे आवश्यक आहे, असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

सध्या संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी सन २००८ नंतर तिसरे अपत्य नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे तीन अपत्ये असलेल्या अनेक शेतकरी कुटुंबांना या अटीची पूर्तता करता येत नाही. परिणामी, पात्रता आणि गरज असूनही त्यांना ७५ टक्के अनुदानावर मिळणाऱ्या मिल्किंग मशीन, कडबा कुट्टी मशीन, शेळी गट आणि कुक्कुटपालन यांसारख्या योजनांचा लाभ घेता येत नाही. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह शेती आणि पशुपालनावर अवलंबून असल्याने अशा कुटुंबांना योजनांपासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

या मागणीच्या समर्थनार्थ त्यांनी सर्वोच्च न्यायालयातील अलीकडील निरीक्षणांचा संदर्भ दिला. दोन अपत्यांच्या अटीसंदर्भातील कायद्यांचा बदलत्या सामाजिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर फेरविचार होण्याची गरज न्यायालयाने अधोरेखित केल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच देशातील प्रजनन दरात झालेली घट आणि काही राज्यांनी दोन अपत्यांची अट शिथिल अथवा रद्द करण्याच्या दिशेने घेतलेले निर्णय यांचाही विचार महाराष्ट्र शासनाने करावा, असे आवाहन त्यांनी केले.

निवडणूक लढविण्याची पात्रता आणि शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ मिळण्याची पात्रता या दोन वेगळ्या बाबी आहेत. त्यामुळे योजनेच्या लाभासाठी असलेल्या अटींमध्ये शासनाला धोरणात्मक निर्णय घेऊन योग्य ती सवलत देता येऊ शकते. गरजू शेतकऱ्यांना लाभ मिळावा, या उद्देशाने जिल्हा परिषद आणि राज्य शासनाने या अटीत आवश्यक बदल करावेत, अशी मागणीही भुजबळ यांनी केली.

याशिवाय, योजनेचा अर्ज भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज भरताना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सोपी करण्याबरोबरच गावपातळीवर लाभार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन आणि सहकार्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

शेतकरी हा जगाचा पोशिंदा असून तो आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला तरच देशाची अर्थव्यवस्था मजबूत होईल. शेतकऱ्याला कर्ज, कागदपत्रे आणि जाचक अटींमध्ये अडकवून ठेवण्याऐवजी त्याला स्वावलंबी बनविण्याचे धोरण शासनाने स्वीकारले पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारने केवळ आश्वासने न देता योजनांचा प्रत्यक्ष लाभ गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा. बळीराजाचा बळी जाऊ देऊ नये, हीच रयतेच्या राज्याची खरी भूमिका असली पाहिजे, असे सिमाताई भुजबळ यांनी स्पष्ट केले.

केसनंद येथील सार्वजनिक स्वच्छतागृह धूळखात





केंद्राच्या हागणदारीमुक्त अभियानाला ग्रामपंचायतीकडून केराची टोपली!

- दरवाजे तुटले, दिवे गायब, परिसरात घाणीचे साम्राज्य
- महिलांच्या सुरक्षिततेसह नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर
- प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल ग्रामस्थांमध्ये संताप

सांडपाण्यामुळे दुर्गंधी; डासांच्या प्रादुर्भावाची भीती!

गावातील विविध भागांतून वाहून येणारे सांडपाणी परिसरातील तळ्यात साचत असल्याने दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यातच अस्वच्छता आणि साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिणामी डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढू शकतो. स्वच्छतागृह असूनही त्याचा वापर होत नसल्याने नागरिकांना पुन्हा उघड्यावर शौचास जाण्याची वेळ येत आहे. त्यामुळे हागणदारीमुक्त अभियानाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र दिसत आहे.

पुणे-सोमनाथ साळुंके (दै. आरंभ पर्व)

केंद्र शासनाच्या हागणदारीमुक्त अभियानांतर्गत ग्रामीण भागातील नागरिकांची उघड्यावर शौचास जाण्याच्या समस्येतून सुटका व्हावी, यासाठी गावोगावी सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारण्यात आली. मात्र, देखभाल आणि स्वच्छतेअभावी याच स्वच्छतागृहांची दुरवस्था झाल्याचे चित्र आता ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे. पूर्व हवेली तालुक्यातील केसनंद येथील सार्वजनिक स्वच्छतागृह याचे ज्वलंत उदाहरण ठरत असून, लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली ही सुविधा सध्या समस्यांच्या विळख्यात सापडली आहे. स्वच्छतागृह असूनही नागरिकांना त्याचा वापर करता येत नसल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पुणे-नगर महामार्गापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या केसनंद गावाला वाढत्या औद्योगिकीकरणामुळे शहराचे स्वरूप प्राप्त होत आहे. राज्यासह परराज्यांतील कामगारवर्ग या परिसरात स्थायिक होत असल्याने लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. परिसरात अनेक खासगी कंपन्यांचे जाळे विस्तारले असून, नागरिकांची वर्दळही वाढली आहे. अशा परिस्थितीत सार्वजनिक स्वच्छतागृहांची आवश्यकता अधिक असताना उपलब्ध असलेल्या सुविधेचीच दुरवस्था झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. पूर्वी या परिसरात सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने नागरिकांना उघड्यावर शौचास जाण्याची वेळ येत होती. विशेषतः महिलांची मोठी कुचंबना होत होती. ही समस्या दूर करण्यासाठी लाखो रुपये खर्च करून महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात आली. मात्र, सध्या या स्वच्छतागृहांमध्ये प्रत्येकी तीन खोल्या असूनही त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. शौचालयातील भांडी तुटलेली, दरवाजे मोडकळीस आलेले आणि आवश्यक सुविधांचा अभाव असल्याने नागरिकांनी या स्वच्छतागृहांकडे पाठ फिरवली आहे. स्वच्छतागृहात रात्रीच्या वेळी नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी विद्युत दिव्यांची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, सध्या दिव्यांचे साहित्य चोरीला गेल्याने परिसरात रात्री पूर्णपणे अंधार असतो. अशा परिस्थितीत महिलांना स्वच्छतागृहाचा वापर करणे धोकादायक वाटत आहे. रात्रीच्या वेळी एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत. स्वच्छतागृहाच्या आवारात मोठ्या प्रमाणात झाडेझुडपे आणि गवत वाढले आहे. त्यामुळे सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर वाढण्याची भीती निर्माण झाली आहे. परिसराची नियमित स्वच्छता होत नसल्याने नागरिक घरातील कचरा याच ठिकाणी टाकत आहेत. परिणामी कचऱ्याचे ढीग साचून परिसराचे रूपांतर कचराकुंडीत झाले आहे. अनेकदा कचरा उचलण्याऐवजी तो जाळला जात असल्याने धुराचे लोट पसरतात. यामुळे वायुप्रदूषण वाढून नागरिकांना श्वसनविकारांचा त्रास होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायतीमध्ये सफाई कामगार कार्यरत असतानाही या सार्वजनिक स्वच्छतागृहाची नियमित साफसफाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. देखभाल, दुरुस्ती आणि स्वच्छतेकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्यामुळे लाखो रुपये खर्चून उभारलेली सुविधा वापरण्यायोग्य राहिलेली नाही. या कामाच्या दर्जाबाबत तसेच देखभालीसाठी झालेल्या खर्चाबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शहरात स्वच्छ आणि सुंदर पुण्याचा नारा दिला जात असताना ग्रामीण भागातील सार्वजनिक सुविधांची अशी दुरवस्था असणे ही प्रशासनासाठी निश्चितच चिंतेची बाब आहे. स्वच्छ भारत अभियानाचे उद्दिष्ट केवळ स्वच्छतागृहे उभारणे नसून त्यांचा नियमित वापर, देखभाल आणि स्वच्छता राखणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

स्वच्छतागृहाची दुरुस्ती करा, अन्यथा हटवा!

केसनंद ग्रामपंचायतीने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन स्वच्छतागृहाची दुरुस्ती करावी, विद्युत दिवे बसवावेत, दरवाजे आणि शौचालयांची भांडी बदलावीत तसेच नियमित साफसफाईची व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. स्वच्छतागृह वापरण्यायोग्य करणे शक्य नसेल, तर त्याबाबत योग्य निर्णय घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशीही भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे. अन्यथा शासनाच्या निधीतून उभारलेल्या सार्वजनिक सुविधांची अशीच वाताहत होत राहिल्यास स्वच्छ भारत आणि हागणदारीमुक्त अभियानाचा उद्देश केवळ कागदावरच उरेल. प्रशासनाने वेळीच लक्ष घालून ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
दैनिक आरंभपर्वमध्ये
बातमीदार होण्याची संधी!
पुणे शहरासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रतिनिधींची नियुक्ती करणे आहे.
अल्पावधीतच पुणे शहरासह जिल्ह्यात नावारूपास आलेल्या दैनिक आरंभपर्व या वृत्तपत्रासाठी पुणे शहर, उपनगरे तसेच जिल्ह्यातील विविध तालुके व ग्रामीण भागांमध्ये बातमीदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे.
पत्रकारितेची आवड असणाऱ्या,
सामाजिक प्रश्नांची जाण असणाऱ्या
आणि आपल्या परिसरातील जनतेचे
प्रश्न निर्भीडपणे मांडण्याची इच्छा असणाऱ्या
उत्साही व्यक्तींना संधी...
दैनिक आरंभपर्व PRESS
नियुक्ती करावयाची ठिकाणे
पुणे शहर व उपनगरे :
कात्रज, वारजे माळवाडी, कर्वेनगर, बाणेर, औंध, कोथरूड, हडपसर, मांजरी, आव्हाळवाडी, मुंढवा, कोरेगाव पार्क, गुजरवाडी, संगमवाडी, येरवडा, वडगाव शेरी, खराडी, वडकी, फुरसुंगी, थेऊर, लोहगाव, विश्रांतवाडी, दिघी आदी परिसर.
जुन्नर तालुका – नारायणगाव, आळेफाटा, बेल्हे, माळशेज, नाणेघाट, शिरोली.
आंबेगाव तालुका – भीमाशंकर, तळघर.
खेड तालुका – खेड, चाकण, बहुळ, वाडा, श्री क्षेत्र आळंदी, सोलू, मरकळ.
शिरूर तालुका – शिरूर, शिक्रापूर, रांजणगाव गणपती, कारेगाव, न्हावरा, तळेगाव ढमढेरे, केंदूर, पाबळ.
हवेली तालुका
उरुळी कांचन, न्हावी सांडस, पेरणे, पिंपरी सांडस.
दौंड तालुका
दौंड शहर, हिंगणगाव, यवत, राहू, पारगाव-शालू-मालू, केडगाव स्टेशन, वरवंड, खुटबाव, गिरीम, कुरकुंभ.
बारामती तालुका
नीरा, सुपा, सोमेश्वरनगर, वालचंदनगर, उंडवडी.
इंदापूर तालुका
वडापुरी, बावडा, सराटी, अंथुर्णे, निमगाव केतकी, भिगवण.
मावळ तालुका
वडगाव मावळ, मळवली, कामशेत, लोणावळा.
मुळशी तालुका
मुळशी शहर, पिरंगुट, पौड रोड, खारावडे म्हसोबा.
इच्छुकांनी संपर्क साधावा
श्री. लक्ष्मण साबळे ८६०५२८४२७२
श्री. सोमनाथ साळुंके ८४४६७९९३८३
श्री. प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२

दै. आरंभ पर्वला जाहिरात देऊन तर पहा..!

आपल्या व्यवसायाची भरारी, आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा **दैनिक आरंभ पर्व.**

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरणीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

आपल्या यशाची सुरुवात योग्य प्रसिद्धीपासून...!



आजच जाहिरात द्या आणि आपल्या व्यवसायाला द्या नवी ओळख..!

दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात, उद्याची यशोगाथा..!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार NEWS CHANNEL



दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!

आपणही बना आमच्या टीमचा भाग !



महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

आम्हाला हवे आहेत :

पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक.
पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

आमच्याशी जोडल्याने मिळेल :

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- निःपक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! **समाजाचा आवाज बना!**

आपली ओळख करा...
आपला आवाज बुलंद करा!

संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!